PDF Compressor Free Version

# महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ,

10/2, स्टार्की टाऊन, मंगळवारी बाजार, सदर, नागपूर 440 001
दूरध्वनी क्रमांक 0712-2978844
E-mail ID : mahaecotourism@mahaforest.gov.in

विषय: महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक 16/12/2021 रोजी आयोजित 14 व्या सभेच्या कार्यवृत्तांता बाबत.
क्रमांक: व्यसं/मनिपविमं-सभा/प्र.क्र.121/21-22/4179
नागपूर: 440 001, दिनांक : 28/12/2021

प्रति,

1. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, महाराष्ट्र राज्य, नागपूर.
2. प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
3. व्यवस्थापकीय संचालक, एफडीसीएम लि. नागपूर तथा सदस्य कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी.
4. प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी (महाकॅम्पा), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
5. प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
6. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर तथा सदस्य सचिव कार्यकारी समिती.
7. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती.
8. अपर प्रधान मुख्यवनसंरक्षक (वन्यजीव), पुर्व नागपूर तथा सदस्य, कार्यकारी समिती.
9. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ, मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती किंवा त्यांचे प्रतिनिधी .
10. मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती तथा सदस्य कार्यकारी समिती.
11. डॉ. विजय लक्ष्मणराव घुगे, संस्थापक, अध्यक्ष, निसर्ग विज्ञान मंडळ, नागपूर, सदस्य कार्यकारी समिती.
12. डॉउज्वला शिरीष चक्रदेव.B.Arch.M.Tech. Ph.D.Principal.W.E.S.s Smt. Mnoramabai Mundle College of Architecture,Nagpur सदस्य कार्यकारी समिती.
13. श्री.प्रफुल्ल मधुसुदन भांबुरकर.Co ordinator & Project Advisor, Wildlife Trust of India, Nagpur सदस्य कार्यकारी समिती.
14. श्री.हर्षवर्धन धनवटे, प्लॉट नं. 59 ,60 शिवनेरी, रामदास पेठ नागपूर सदस्य कार्यकारी समिती.
15. उप-महाप्रबंधक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

PDF Compressor Free Version

**संदर्भ** : या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-६/लले/का.सभा/प्र.क्र.१२६/२१-२२/४४० दिनांक ०३/१२/२०२१

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची 14 वी सभा, मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर तथा अध्यक्ष कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 16/12/2021 रोजी दुपारी 2.30 वाजता "कंट्रोल 2कमांड रुम", वनभवन, नागपूर येथे संपन्न झाली. सदर सभेचा कार्यवृत्तांत सोबत माहितीसाठी सादर करण्यात येत आहे.

**सहपत्र:- वरील प्रमाणे.**

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

**प्रतिलिपी:**-प्रधान सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई -400 032 यांना वरीलप्रमाणे सहपत्रांसह माहितीस्तव सादर.

**प्रतिलीपी:**-अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मीक), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना वरील प्रमाणे सहपत्रासह सस्नेह अग्रेषीत.

**प्रतिलिपी:**-मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) सर्व यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:**-वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी:**-विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) कोल्हापूर यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

**प्रतिलिपी:**-उप विभागीय वन अधिकारी वन अधिकारी, मालेगांव, नाशीक वनवृत्त यांना वरील प्रमाणे सहपत्रांसह योग्य त्या कार्यवाहीस अग्रेषित.

सदस्य-सचिव, कार्यकारी समिती तथा
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

प्रत — कक्ष-2, योजना, मनिपविमं यांना सहपत्रांसह माहिती व आवश्यक त्या पुढील कार्यवाहीसाठी.

PDF Compressor Free Version

## महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या दिनांक १६/१२/२०२१ रोजी संपन्न झालेल्या कार्यकारी समितीच्या सभेचा कार्यवृतांत

महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीची १४ वी सभा दिनांक १६ डिसेंबर, २०२१ रोजी दुपारी २.३० वाजता प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपुर तथा अध्यक्ष, कार्यकारी समिती, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांचे अध्यक्षतेखाली "कमांड कंट्रोल रुम " वनभवन, रामगिरी रोड, सिव्हील लाईन्स, नागपूर येथे संपन्न झाली. सभेत उपस्थित कार्यकारी समिती सदस्य व आमंत्रीत अधिकाऱ्यांची यादी *(परिशिष्ट-१)*नुसार सोबत जोडली आहे.

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ तथा सदस्य-सचिव यांनी ***चौदाव्या सभेच्या*** सुरुवातीस अध्यक्षांचे व उपस्थित सर्व सदस्यांचे व इतर अधिकाऱ्यांचे स्वागत केले व त्यानंतर अध्यक्षांचे परवानगीने विषयसूचीनुसार सभेच्या कामकाजास सुरुवात केली.

सभेमध्ये सर्व विषयावर सविस्तर चर्चा होऊन कार्यकारी समिती व्दारे खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

| अ.क्र. | विषय | समितीचे निर्णय |
|---|---|---|
| **विषय क्रमांक १** | | |
| १. | दिनांक २९/०७/२०२१ रोजी झालेल्या १३ व्या बैठकीचा कार्यवृतांत कायम करणे बाबत. | कार्यवृतांताबाबर कोणत्याही सदस्याकडून कोणत्याही विषयावर आक्षेप किंवा सुधारणाबाबत सुचना प्राप्त झालेल्या नाहीत. तरी कार्यवृतांत कायम करण्यास समितीने मान्यता दिली. |
| **विषय क्रमांक २** | | |
| 2. | निसर्ग पर्यटन विस्तार सादरीकरण. | श्री गिलीर सोन्वने KERT Works LLP यांनी बंगल्वैन पर्यटन व निसर्ग पर्यटन विस्तार या विषयावर सादरीकरण केले. त्यामध्ये प्रामुख्याने ज्या निसर्ग पर्यटन स्थळावर पर्यटकांना मुलभुत सोयी उपलब्ध नाहीत त्या अस्थायी स्वरुपात उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने त्यांनी तयार केलेल्या पर्यटक उपयोगी संसाधनांची माहिती दिली. त्यामध्ये प्रामुख्याने तंबू निवास व्यवस्था, फर्नीचर, किचन इत्यादी कमी जागेत व अल्प वेळेत उभारता येऊ शकणार आहे व एका ठिकाणा वरुन दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरीत करणेयोग्य साहित्या बाबत, साहित्याची गुणवत्ता व किंमत इत्यादी बाबत सविस्तर माहिती दिली. १८ ते २० पर्यटकांना राहणे योग्य सोयी निर्माण करण्याकरिता अंदाजे ४० ते ५० लाख रु. खर्च अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. या संसाधनाचा उपयोग अस्थायी स्वरुपात असणे, निसर्गाची किमान हानी व वन संवर्धन अधिनियम १९८० मधील तरतुदी आकृष्ट न होण्याच्या दृष्टीने उपयोगी असल्याचे सांगण्यात आले. तसेच पर्यटकांना निसर्गानुभव मिळण्याच्या दृष्टीने अत्यंत उपयोगी असल्याचेही नमुद केले. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | | यांनी वन विभागामध्ये उपलब्ध निसर्ग पर्यटन स्थळांबाबत सखोल माहिती घेऊन प्रायोगिक तत्वावर किमान दोन ठिकाणी सदर काम करण्याचे निश्चित करावे व त्याबाबतचा प्रस्ताव १५ दिवसाचे आत सादर करावा. अशा सूचना मा. अध्यक्षांनी कार्यकारी समितीच्या सभेत दिल्या. |
| **विषय क्रमांक ३ निसर्ग पर्यटन विकास आराखडयांना मान्यता देणे बाबत.** | | |
| ३.१ | मालेगांव तालुक्यातील गाळणा ऐतिहासिक किल्ला पर्यटन विकास आराखडा मंजूरी बाबत. | श्री. नितीन गुदगे, मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नाशिक व श्री.येडलावार, उप विभागीय वन अधिकारी, मालेगांव यांनी रु. १०६९.०० लक्ष च्या सुधारीत आराखडयाचे सादरीकरण केले. मागील कार्यकारी समितीच्या सभेत समितीने दिलेल्या सूचनांचे अनुषंगाने स्पष्टीकरण दिले तसेच गाळणा किल्ल्याच्या विकासाकरिता पुरातत्व विभागाकडून आवश्यक परवानगी घेण्यात आली असल्याचे देखील नमुद केले. समितीने या संदर्भात खालील प्रमाणे सुचना केल्या.<br>१) आराखडयातील सन २०२१-२२ करीता बाब क्रमांक १, २, ३, ५ व १७ वर नमुद नवीन कामे व सन २०२२-२३ करीता बाब क्रमांक २ घेण्यात येऊ नये. सुविधा कमी पडत असल्यास दुसऱ्या टप्प्यात नविन कामांना आराखडा योग्य समर्थनासह मंडळाकडे मान्यतेस्तव सादर करावा. सर्व विकास कामे पुरातत्व विभागाने दिलेल्या परवानगीत नमुद सुचनांनुसारच करण्यात यावे.<br>२) आराखडयातील इतर बाबींकरीता दर्शविलेल्या अंदाजीत रक्कमेच्या समर्थनार्थ आवश्यक तपशील सादर करावा.<br>३) वन संवर्धन अधिनियम १९८० मधील कोणत्याही तरतुदीचा भंग होणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.<br>४) पालक अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी वरील सुचनं प्रमाणे सदर आराखडयाबाबत आढावा घेऊन सुधारीत आराखडा १० दिवसाचे आत सादर करावा. सन २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधी करिता आराखडयास वरील अटी व शर्तींच्या अधिन तत्वतः मान्यता प्रदान करण्यात आली. |
| ३.२ | राधानगरी अभयारण्य पर्यटन विकास आराखडा मंजूरी बाबत. | रुपये ३०९९.८४ लक्ष च्या सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधी करिता राधानगरी निसर्ग पर्यटन विकास आराखडयाचे सादरीकरण श्री.समाधान चव्हाण वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर व श्री.विशाल माळी, विभागीय वन अधिकारी वन्यजीव कोल्हापूर यांनी केले. समितीने या संदर्भात खालील प्रमाणे सुचना केल्या.<br>१) आराखडयातील बाब क्रमांक ३, ५, १७, २०, २२ व २८ वर नमूद कामे घेण्यात येऊ नये.<br>२) आराखडयातील बाब क्रमांक ४ करीता रुपये २५.०० लाख, बाब क्रमांक ११ करीता रुपये ३०.०० लाख, बाब क्रमांक १३ करीता रुपये ५०.०० लाख इतक्याच रक्कमेची तरतूद करावी. |

PDF Compressor Free Version

| | | |
|---|---|---|
| | | ३) आराखड्यातील बाब क्रमांक २६ मधील काम आवश्यकतेनुसार दुसऱ्या टप्प्यात करण्यात यावी.<br>४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदरील चर्चेच्या अनुषंगाने आराखड्यामध्ये आवश्यक त्या सुधारणा करुन सुधारीत आराखडा १० दिवसाचे आत मंडळाकडे सादर करावा अशा सूचना दिल्या. तसेच आराखड्यात नमूद बाबीचे पुनर्विलोकन करुन वर्षनिहाय विभागणी करुन सुधारीत आराखडा सादर करण्याबाबत सूचना देण्यात आल्या. सन २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधी करिता आराखड्यास वरील अटी व शर्तींच्या अधिन तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली. |
| ३.३ | ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प पर्यटन विकास आराखडा मंजूरी बाबत. | श्री.जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प यांनी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प निसर्ग पर्यटन विकासा करिता रु. १३०६५.३४ लाख चे आराखड्याचे उत्तम सादरीकरण केले. समितीद्वारे सन २०२१-२२ ते २०२६-२७ या कालावधी करिता आराखड्यास मान्यता प्रदान करण्यात आली. |
| ३.४ | संजय गांधी राष्ट्रीय उद्यान पर्यटन विकास आराखडा मंजूरी बाबत | श्री.मल्लीकार्जुन, वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली यांनी आराखड्याचे उत्तम सादरीकरण केले. आराखड्यात नमुद नागला कांदळवन क्षेत्राचे विकासाकरिता अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, मुंबई यांनी कांदळवन फाऊंडेशन मधून निधी उपलब्ध करुन द्यावा अशा सुचना देण्यात आल्या. समितीद्वारे रु. ४८१८.०० लक्ष चे आराखड्यास सन २०२१-२२ ते २०२३-२४ या कालावधी करिता मान्यता प्रदान करण्यात आली. |
| ३.५ | पेंच व्याघ्र प्रकल्प पर्यटन विकास आराखडा मंजूरी बाबत. | श्री. प्रभुनाथ शुक्ला, उपवनसंरक्षक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर यांनी पेंच व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील निसर्ग पर्यटन विकासा करीता बोर / उमरेड कऱ्हांडला अभयारण्य आराखड्याचे उत्तम सादरीकरण केले. समितीद्वारे रु. ४७००.०० लक्ष चे आराखड्यास २०२१-२२ ते २०२५-२६ या कालावधी करिता खालील अटिंच्या अधिन तत्वत: मान्यता प्रदान करण्यात आली.<br>१) आराखड्यात खालील बाबींचा समावेश करावा.<br>अ) स्थानिक जनतेच्या सहभाग<br>ब) स्थानिक युवकांची क्षमता बांधणी प्रशिक्षण<br>क) क्षेत्रीय अधिकारी/ कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण<br>ड)स्थानिक विद्यार्थ्यांकरीता निसर्गानुभव कार्यक्रम राबविणे<br>ई) प्रचार/ प्रसिध्दी कार्यक्रम |

**विषय क्रमांक ४**

| | | |
|---|---|---|
| ४. | सन २०२१-२२ करिता निधी मागणी करिता प्रस्ताव सादर करणेबाबत सद्यस्थिती. | राज्य योजना निसर्ग पर्यटन विकास २४०६ २२९५ अंतर्गत सन २०२१-२२ करिता रु.६०००.०० लक्ष चा नियतव्यय मंजूर आहे. त्या अनुषंगाने संबंधित नियंत्रक अधिकाऱ्याकडून त्यांचे अधिनस्त निसर्ग पर्यटन स्थळांचे विकासाकरिता आवश्यक निधी त्याकरिता तांत्रीक व प्रशासकीय मान्यतेसह प्रस्ताव सादर |

करण्याबाबत सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. खालील तक्त्यात दिल्यानुसार संबंधित नियंत्रक अधिका-यांनी सद्यस्थिती नमुद केली.

| अ क्र | पर्यटन स्थळाचे नांव | आवश्यक निधी रु.लाखात | प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पेंच व्याघ्र प्रकल्प | ५९४.०० | १ आठवडा व आराखडा मुदतवाढ प्रस्ताव |
| २ | टिपेश्वर अभयारण्य | रिक्त | १ आठवडा |
| ३ | नवेगाव नागझीरा व्या.प्र. | १५२.०० | १ आठवडा |
| ४ | कोंधना अभयारण्य | १२३.३० | १५ दिवस |
| ५ | चांदोली | १५०.०० | १५ दिवस |
| ६ | रिसनगांव | ६५.०० | १ आठवडा |
| ७ | अजंठा | ३५.०० | १ आठवडा |
| ८ | नांदूर मधमेश्वर | २५.००<br>१००.०० | प्रस्ताव सादर<br>१५ दिवस |
| ९ | बोर व्याघ्र प्रकल्प | ११९.०० | १ आठवडा व आराखडा मुदत वाढ प्रस्ताव |
| १० | उमरेड क-हांडला अभयारण्य | ३३६.०० | १ आठवडा व आराखडा मुदत वाढ प्रस्ताव |
| ११ | भिडेवाडी उद्यान पुणे | २३.५१ | प्रस्ताव सादर |
| १२ | पाचगांव पर्वती पुणे | ८२.०० | प्रस्ताव सादर |
| १३ | श्रीक्षेत्र वल्हा पुणे | ५०.७२ | प्रस्ताव सादर |
| १४ | कन्हेरी वन उद्यान | ४९४.०० | १५ दिवस |
| १५ | ताडोबा अंधारी व्या.प्र.चं | १२००.०० | १ आठवडा |

वनक्षेत्रात निसर्ग पर्यटन क्षेत्राचा विकास (TSP राज्य) ४४०६-८६५२ अंतर्गत सन २०२१-२२ करिता रु. १२००.०० लक्ष या नियतव्यय मंजूर आहे. त्या अनुषंगाने संबंधित नियंत्रक अधिका यांचेकडून त्यांचे अधिनस्त निसर्ग पर्यटन स्थळांचे विकासाकरिता आवश्यक निधी त्याकरिता तांत्रीक व प्रशासकीय मार्गदर्शक सूचनेनुसार प्रस्ताव सादर करण्याबाबत सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला. खालील तक्त्यात दिल्यानुसार संबंधित नियंत्रक अधिका-यांनी सद्यस्थिती नमुद केली.

| अ क्र | पर्यटन स्थळाचे नांव | आवश्यक निधी रु.लाखात | प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|
| १ | पेंच व्याघ्र प्रकल्प | ८००.०० | २ आठवडे |

PDF Compressor Free Version

| | | | |
|---|---|---|---|
| २ | बोडाझरी | ८०.०० | १ अठवडा |
| ३ | हनुमान टेकडी गडचिरोली | ८७.२० | प्रस्ताव सादर |
| ४ | सिपना, वन्यजी मेळघाट व्याघ्र प्रकल्प. | ३३.०४ | प्रस्ताव सादर |
| ५ | कळसुबाई हरीशचंद्रगड नाशिक वन्यजीव, विभाग | ११२.३६ | प्रस्ताव सादर |
| ६ | चाळल अभयारण्य नाशिक वन्यजीव विभाग | ५३.९५ | प्रस्ताव सादर |
| ७ | अंजनेरी नाशिक | ४१.७१ | प्रस्ताव सादर |

**विषय क्रमांक ५**

| | | |
|---|---|---|
| ५. | सन २०२२-२०२३ वर्षाचे निसर्ग पर्यटन विकास अंदाजपत्रक. | निसर्ग पर्यटन स्थळांचे विकासाकरीता सन २०२२-२३ करीता मंडळाद्वारे वार्षीक आराखडा तयार करण्यात आलेले आहे.त्यानुसार राज्यातील प्रमुख २० निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरीता रुपये ८०००.०० लक्षचा वार्षीक आराखडा तयार करण्यात आले असल्याबाबत व्यवस्थापकीय संचालकांनी सभेला माहिती दिली. |
| ६. | वेळेवर ठेवण्यात आलेले विषय. | १) मंडळाचे कार्यालयात एकुण ८ पदे मंजूर असून त्यापैकी ४ पदे रिक्त आहेत. तसेच मंडळाचे कार्यालयातील कामे सुचारु पध्दतीने चालविण्याच्या दृष्टीने आवश्यक अधिकारी/कर्मचारी यांची कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यात आली असून सद्यस्थितीत १ विभागीय वन अधिकारी, सेवानिवृत्त, १ मुख्य लेखापाल सेवानिवृत्त, २ कक्ष सहाय्यक, १ वाहन चालक, ३ सुरक्षा कर्मचारी, १ शिपाई, १ सफाई कर्मचारी अर्धवेळ असे एकुण १० अधिकारी/कर्मचारी कंत्राटी पध्दतीवर नियुक्त करण्यात आले असल्याबाबत व्यवस्थापकीय संचालकांनी सभेला माहिती दिली.<br>२) मंडळाचे पॅनल वरील तज्ञ सल्लागार वास्तुशास्त्रज्ञ नियुक्ती करण्याबाबतचा कालावधी २० डिसेंबर २०२१ रोजी संपुष्टात येत असल्यामुळे नवीन पॅनल तयार करण्याबाबत आवश्यक प्रक्रीया पूर्ण करण्यात येत आहे याबाबत व्यवस्थापकीय संचालकांनी सभेला माहिती दिली. |

कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी दिलेल्या सूचना.

१) निसर्ग पर्यटन विकास मंडळ यांच्यामार्फत कार्यरत असून राज्यातील निसर्ग पर्यटन स्थळांच्या विकासाकरिता मंडळाचे माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या निधीव्दारे किंवा मंडळाचे कार्यकारी समिती व्दारे मान्यता देण्यात आलेल्या निसर्ग पर्यटन विकास आराखड्यानुसार राज्य योजना व्यतिरिक्त प्राप्त निधीव्दारे निसर्ग पर्यटन विकास कामे मोठ्या प्रमाणावर करण्यात येत आहे परंतु पर्यटन स्थळांवर मंडळाचे अस्तित्व दिसून येत नाही. तरी यापुढे सर्व निसर्ग पर्यटन विकासासंबंधी होणाऱ्या प्रत्येक बाबीवर निसर्ग पर्यटन विकास मंडळाचा लोगो देणे बंधनकारक करण्यात येत आहे.

PDF Compressor Free Version

व्याघ्र प्रकल्प, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व त्या व्यतिरीक्त ज्या निसर्ग पर्यटन स्थळाची स्वतंत्र वेबसाईट आहे त्यामध्ये मंडळाचा लोगो समाविष्ट करण्यात यावा. त्याचप्रमाणे निसर्ग पर्यटन स्थळांवरील सर्व माहिती फलके (Signboard), प्रवेशद्वार, प्रचार प्रसिध्दी साहित्य, कॉफी टेबल बुक व इतर प्रकाशने यावर मंडळाचा लोगो अंकीत करणे आवश्यक राहील.

२) मंडळाचे अद्ययावत वेबसाईट तयार करण्याचे काम जवळपास पुर्ण झालेले आहे. त्याकरिता प्रत्येक पर्यटन स्थळाचे नियंत्रक अधिकाऱ्यांनी प्रसिध्दीच्या दृष्टीने उत्कृष्ट फोटो व लहान आकाराच्या व्हीडीयो क्लीप्स मंडळाकडे तात्काळ सादर कराव्या.

3) निसर्ग पर्यटन स्थळावर पर्यटकांनी भेटी दिल्यानंतर त्यांचा अनुभव कसा होता याबाबत feedback घेण्याकरिता आवश्यक ती प्रक्रीया राबविण्यात यावी.

श्रीमती दिप्ती पाटील, टुरीझम डेव्हलपमेंट कंसल्टंट यांनी दिव्यांग व्यक्तींना निसर्गानुभव घेण्याचे दृष्टीने निसर्ग पर्यटन स्थळांवर आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध करणेबाबत सभेत आपिल केले. त्यामध्ये प्रामुख्याने ऑडीयो व्हीडीयो साऊंड, व्हीलचेअर उपलब्ध असणे बाबत नमुद केले. यावर प्रायोगिक स्तरावर संजय गांधी राष्ट्रीय उद्यान व ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प पर्यटन स्थळांवर अशी व्यवस्था उभारण्यात येईल असे मान्य करुन सभेत संबंधीतांना सुचना देण्यात आल्या.

सभेच्या शेवटी व्यवस्थापकीय संचालक, निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर यांनी उपस्थितांचे आभार मानून अध्यक्षांचे परवानगीने सभा संपल्याचे जाहीर केले.

सदस्य सचिव, कार्यकारी समिती व
व्यवस्थापकीय संचालक,
महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळ, नागपूर

कार्यवृत्तांत प्र.मु.व.सं. (वन) तथा
अध्यक्ष,का.स., मनिपविमं यांचेद्वारा मंजुर.

PDF Compressor Free Version

*परिशिष्ट - १*

## दिनांक १६ डिसेंबर २०२१ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र निसर्ग पर्यटन विकास मंडळाच्या कार्यकारी समितीच्या १४ व्या सभेमध्ये उपस्थितांची यादी

| अ.क्र. | अधिकाऱ्यांचे नांव | समितीमधील पद | पदनाम |
|---|---|---|---|
| १ | श्री.जी.साईप्रकाश | अध्यक्ष | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| २ | श्री.प्रदीप कुमार | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर अति. कार्यभार |
| ३ | श्री.एस.जी.टेंभूर्णीकर | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक व मुख्य कार्यकारी अधिकारी, (महाकॅम्पा) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ४ | श्री.सुनील लिमये | सदस्य | प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) महाराष्ट्र राज्य, नागपूर |
| ५ | श्री.विकास गुप्ता | सदस्य सचिव | व्यवस्थापकीय संचालक, मनिपविमं. नागपूर तथा सदस्य सचिव, कार्यकारी समिती,मनिपविमं. नागपूर |
| ६ | श्री. व्ही.आर. तिवारी | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई तथा सदस्य, कार्यकारी समिती, मनिपविमं, नागपूर |
| ७ | श्री.बी.एस.हुडा | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पूर्व नागपूर |
| ८ | डॉ. विजय लक्ष्मणराव घुगे | सदस्य | संस्थापक, निसर्ग विज्ञान, मंडळ, नागपूर |
| ९ | श्री.प्रफुल एस भांबुरकर | सदस्य | Co ordinator & Project Advisor Wildlife Trust of India, Nagpur |
| १० | श्री.हर्षवर्धन धनवटे | सदस्य | टायग्रेस अँट घोसरी व्हीलेज, घोसरी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाजवळ, भद्रावती चंद्रपूर |
| ११ | श्रीमत. क्षिप्रा बोरा | सदस्य | वरीष्ठ व्यवस्थापक, एम. टी. डी. सी. रीजनल हेड, नागपूर डिव्हीजन |
| १२ | श्रीमती आर.एस.गावंडे | सदस्य | सहा.व्यवस्थापक, नि.प. प्रतिनीधी, एफ. डी. सी. एम. नागपूर |
| १३ | श्रीमती श्रीलक्ष्मी | | उपमहा प्रबंधक, मनिपविमं. नागपूर अति. कार्यभार |
| १४ | श्री.प्रभुनाथ शुक्ला | | उपवनसंरक्षक, पेंच व्याघ्र प्रकल्प, नागपूर |
| १५ | श्री.किशोर मिश्रीकोटकर | | उप महाप्रबंधक (कंत्राटी) |
| | **आभासी V.C. व्दारे सभेस उपस्थितांची यादी** | | |
| १६ | श्री.व्ही.आर.तिवारी | सदस्य | अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), पश्चिम मुंबई, अतिरिक्त कार्यभार |
| १७ | श्री.पी.कल्याण कुमार | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नागपूर |
| १८ | श्री.एस.व्ही.रामाराव | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) ठाणे |
| १९ | श्री.एन.आर.प्रविण | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) चंद्रपूर |
| २० | श्री.एस.डी.दोडल | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) पुणे |
| २१ | श्री.एन.बी. गुदगे | | मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक) नाशिक |

PDF Compressor Free Version

| | | | |
|---|---|---|---|
| २२ | श्रीमती ज्योती बॅनर्जी | सदस्य | मुख्य वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती |
| २३ | श्री.आर.एन.रामानुजम | | वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, नवेगांव, नागझीरा, गोंदिया |
| २४ | श्री. प्रकाश लोणकर | | वनसंरक्षक (प्रादेशिक) यवतमाळ |
| २५ | श्री.सत्यजीत गुजर | | वनसंरक्षक (प्रादेशिक) औरंगाबाद |
| २६ | श्री.ए.एम.अंजनकर | | वनसंरक्षक (वन्यजीव) नाशिक |
| २७ | श्री.मल्लीकार्जुन | | वनसंरक्षक तथा संचालक, संजय गांधी राष्ट्रीय उद्यान, बोरीवली |
| २८ | श्री.एस.रमेश कुमार | | वनसंरक्षक (वन्यजीव), पुणे |
| २९ | डॉ. जितेंद्र रामगांवकर | | वनसंरक्षक तथा क्षेत्रसंचालक, ताडोबा अंधारी, व्याघ्र प्रकल्प, चंद्रपूर |
| ३० | डॉ. किशोर मानकर | | वनसंरक्षक (प्रादेशिक) गडचिरोली |
| ३१ | श्री. समाधान चव्हाण | | वनसंरक्षक तथा क्षेत्र संचालक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर |
| ३२ | डॉ.बी.एन. पिंगळे | | उपवनसंरक्षक (वन्यजीव) ठाणे |
| ३३ | श्री.आर.एन.पाटील | | उपवनसंरक्षक (वन्यजीव) पुणे |
| ३४ | श्री.यू.एस. सावंत | | उपवनसंरक्षक, सह्याद्री व्याघ्र प्रकल्प, कोल्हापूर |
| ३५ | श्री.के.एस.जगताप | | उपवनसंरक्षक (प्रादेशिक) पांढरकवडा |
| ३६ | श्री.व्ही.एन.माळी | | विभागीय वन अधिकारी (वन्यजीव), कोल्हापूर |
| ३७ | आर.बी.गवई | | विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) बोर अभयारण्य, नागपूर |
| ३८ | श्री.जे.एन.येडलावार | | उप विभागीय वन अधिकारी, मालेगांव नाशिक |
| ३९ | श्री.मिलींद सोनवने | | KERF Works LLP |